शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे नियतप्रकाशित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष : अकरावे अंक : चाळीसावा

ऑक्टोबर - नोव्हेंबर - डिसेंबर २०२२

# भाषांतर : संकल्पना आणि स्वरूप

कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा

दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र

भिन्नभाषिक साहित्याची मराठी भाषांतरे

२६. अनुवादः संकल्पना व स्वरूप - डॉ. प्राजक्ता निकम १६७
२७. तौलनिक साहित्य व भाषांतर : स्वरूप, संकल्पना - प्रा. लक्ष्मण बोराटे १७३
२८. भाषांतर संकल्पनेचा विकास - डॉ. मनीषा नायकवडी १८०
२९. भाषांतर : साहित्य समृद्धीचे साधन - प्रा. आशालता खोत १९१
३०. भाषांतर आणि वाचनसंस्कृती - प्रा. लता माळी १९८
३१. मराठी साहित्यातील भाषांतरविषयक जाणिवा - प्रा. रघुनाथ मुडळे २०३
३२. भाषांतर आणि संस्कृती अभ्यास - प्रा. प्रज्ञा कांबळे - शिरगावकर २११
३३. भाषांतर आणि रोजगाराच्या संधी - प्रा. रघुनाथ गवळी २१८
३४. १९व्या शतकातील अनुवादित कादंबरीचे स्वरूप - डॉ. सुभाष पाटील २२४
३५. भाषांतर संकल्पना व स्वरूप -प्रा. श्रीरंग तराळ २३५
३६. अनुवाद- शास्त्र की कला? - डॉ. शर्मिला घाटगे २४३
३७. भाषांतर : सांस्कृतिक समस्या - प्रा. सौ. उज्ज्वला देसाई २४८
३८. सुप्रिया वकील यांच्या अनुवादित साहित्याचे विशेष - डॉ. विनोद कांबळे २५६
३९. निशिकांत ठकारांची भाषांतरविषयक भूमिका -प्रा. सौ. संगीता खरात २६२
४०. सोनाली नवांगुळ : भाषांतरित साहित्यातील आश्वासक चेहरा - प्रा. गुंडोपंत पाटील २६९
४१. भिन्नभाषिक भाषांतराची प्रक्रिया - प्रा. (डॉ.) सविता व्हटकर २८२
४२. अनुवादित साहित्य : संकल्पना व स्वरूप - डॉ. सागर पाटील २८८
४३. अनुवाद और तुलनात्मक साहित्याध्ययन - चेतन खेलिया २९७
४४. अनुवाद की प्रासंगिकता - प्रा. एस. के. आतार ३०२
४५. रोजगार के परिप्रेक्ष्यमें अनुवाद - डॉ. गणेश गभाले ३०६
४६. Cultural and Geo-Spatial Untranslatability from Marathi into English ३१४
Dr. Datta Sawant
Dr. Tukaram Hapgunde



*ISSN No. 2319-6025*

# अनुवाद- शास्त्र की कला

**प्रा. डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे**

कला आणि वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज.

**गोषवारा :** अलीकडच्या काही वर्षांमध्ये अनुवादाला महत्त्व प्राप्त होऊ लागलेले आहे. भारतासारख्या संस्कृतीक देशात विविध भाषा वैविध्यपूर्ण भौगोलिक परिस्थिती अनेक धर्म जाती रीतीरीवाद दिसून येतात. येथील बहुसंस्कृतिक जीवनामुळे अनुवाद, भाषांतर आणि रुपांतर या प्रक्रियांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. आज साहित्य शिक्षण राजकारण समाजकारण उद्योग व्यापार प्रशासन प्रभावित झालेले आहे.केवळ भारतीय भाषाच नाही तर इंग्रजीसह इतर जागतिक भाषेतील साहित्यही मराठीत अनुवादित होत आहे. दोन देशातील संपर्क, राहणीमान, परस्पर संबंध, व्यवहार वैज्ञानिक सिद्धांत संस्कृती इत्यादी अशा अनेक क्षेत्रांमध्ये भाषांतर महत्त्वाचा भाषांतर प्रक्रिया महत्त्वाची ठरते एका भाषेत व्यक्त झालेले विचार दुसऱ्या भाषेमध्ये व्यक्त करण्याच्या प्रक्रियेला भाषांतर असे म्हटले जाते. आधुनिक करण्याच्या युगात अनुवाद आणि भाषांतर रूपांतर या अभ्यासाला आज महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. पण अनुवाद हा शास्त्र की कला याचा शोधनिबंधातून घेतला आहे.

**संशोधन पदधती :** सदर संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अभ्यासपद्धती याचा वापर केलेला आहे

**उद्दिष्टे :**

१)भाषांतर या साहित्य प्रकाराची सैद्धांतिक पार्श्वभूमी लक्षात घेणे

२) अनुवाद आणि भाषांतर या संकल्पना व्याख्या समजावून घेणे.

३)अनुवाद शास्त्र की कला हे समजावून घेणे

४)अनुवाद आणि भाषांतराच्या पार्श्वभूमीवर ठळक निष्कर्षांची मांडणी करणे

**प्रस्तावना :** मराठी साहित्यात अनुवादाची परंपरा आरंभ पासून म्हणजेच आद्य मराठी साहित्य बरोबर आहे. टीकापर, भाषांतरित, रूपांतरीत व अनुवादित या संकल्पनांमध्ये थोड्याफार अर्थाने फरक दिसून येतो. परंतु अनुवाद म्हणजेच ढोबळ अर्थाने एका भाषेतील दुसऱ्या भाषेत प्रतिबिंबित झालेला सार्थ असे मजकूर असे म्हणता येते. वैयक्तिक सामाजिक राजकीय सांस्कृतिक पार्श्वभूमीवर होत असला तरी साहित्याच्या आस्वाद घेण्याच्या दृष्टिकोनातून आणि संस्कृतीची ओळख पटवून घेण्यासाठी अनुवाद ही संकल्पना महत्त्वाची ठरते.

बीज संज्ञा : अनुवाद, भाषांतर, शास्त्र, कला

अनुवाद : अनुवाद ही व्यापक संज्ञा असून भाषांतर ही तिच्यात सामावणारी तिच्या एका प्रकारचा निर्देश करणारी संज्ञा आहे. भाषांतर हा ही अनुवादच असल्याने त्यातही सारांश विस्तार स्पष्टीकरण गद्य रूपांतर इत्यादी प्रकार संभवतात पण एक भाषिक अनुवादामध्ये सहसा न आढळणारा एक प्रकार भिन्न भाषिक अनुवादामध्ये आढळतो. तो म्हणजे एका भाषेतील साहित्याच्या अर्थ शब्दशः दुसऱ्या भाषेमध्ये उतरवून प्रतिसंहिता तयार करणे हा होत याच प्रकारला रूढ अर्थाने भाषांतर असा म्हणण्याचा प्रघात आहे[१]. थोडक्यात, अनुवाद म्हणजे पुन्हा सांगणे. पुढे भाषांतर प्रक्रियेत अनुवाद भाषांतराचाच एक प्रकार मांडला जाऊ लागला. अनुवाद म्हणजे आशयावर भर देऊन केले गेलेले भाषांतरच होय. मूळ आशयात कोणताही बदल होणार नाही. याची काळजी घेत अनुवादकर्ता जेव्हा काही स्वातंत्र्य घेतो. तेंव्हा अनुवादकर्त्याची अनुवाद करण्याची शैली याचे व्यक्तिमत्व याचाही प्रभाव अनुवादावर पडतो. अनुवादात भाषांतर अंतर्भूत असतेच, पण दोन्ही देखील मुख्य फरक म्हणजे भाषांतरात प्रत्यक्षपणे शब्द व भाषिक संरचना महत्वाची असते. तर अनुवादात एकूण आशयाला महत्त्व दिले गेलेले असते. साहित्यकृतीचे मूळ सत्व कायम ठेवून केलेले ते मुक्त भाषांतरच उदा. ज्ञानेश्वरी म्हणजे 'भावार्थ दीपिका' हे भगवद्गीतेवरील भावार्थ प्रकट करणारे स्वतंत्र भाष्य आहे. मूळ ७०० श्लोकांचा अर्थ सांगताना ज्ञानेश्वरानी मात्र नऊ हजार ओव्या मराठीत लिहिल्या आहेत. याप्रकारे आशयाला महत्त्व देऊन भर घालण्याचे बदल स्वातंत्र्य ज्ञानेश्वराने इथे घेतले आहे. हे अनुवादाचे उत्तम उदाहरण आहे.

**भाषांतर** – सी. रेबीन यांनी भाषांतराची व्याख्या करताना म्हटले आहे की, भाषांतर ही अशी प्रक्रिया आहे की एखाद्या लिखित किंवा मोठेपणाला एका भाषेतून दुसऱ्या भाषेत नेत असताना मूळ भाषेतील अर्थ जसाच्या तसा उतरवणे होय[२].

डॉ. जॉन्सन यांनी अगदी समर्पक व्याख्या केलेली आहे ते म्हणतात. भाषांतर करणे म्हणजे एका भाषेतील अर्थनेत असताना मूळ अर्थाला धक्का न लावणे[३]. उदा. शेक्सपियरच्या किंग लियर या नाटकाचे मराठीतील प्रतिभाशाली कवी वि. दा. करंदीकर यांनी 'राजा लिअर' या नावाने मराठीत भाषांतर केले आहे. भारताचे राष्ट्रपती डॉ ए.पी.जे कलाम यांच्या विंग्स ऑफ फायर'' या मूळ इंग्रजी आत्मचरित्रवजा पुस्तकाचे मराठीत 'अग्निपंख' या नावाने भाषांतर झाले आहे. अर्थात सगळ्याच भाषांतरासाठी ही पद्धत पुरेशी आणि योग्य ठरेल असे नाही. त्यामुळे विशेषतः वाङ्मयासाठी अनुवाद या पद्धतीचा अवलंब केला जातो. अनुवाद शास्त्र आहे की कला? यासंदर्भात प्रश्न निर्माण झालेला दिसून येतो. पण अनुवाद ही कला असूनही

शास्त्र आहे असे म्हणे योग्य ठरेल. शास्त्रीय अनुवादामध्ये भाषा स्पष्ट असून तिथे शैली आणि सर्जनशीलतेला महत्त्व नसते. त्यामध्ये तथ्य सूत्र आणि विषय महत्त्वाचा ठरतो. अलंकारिकता नसते भाषेमध्ये निश्चितता दिसून येते या संदर्भात डॉ. अशोक केळकर म्हणतात, सगळीच शास्त्रे विज्ञानाच्या कक्षेत येत नाहीत की सगळीच कला ललित कलेच्या कक्षेत येत नाहीत. अनुवाद पद्धती शास्त्र ठरली तर विज्ञान ठरत नाही की कला ठरली तरी ललित कला ठरत नाही.[४] कायदा व प्रशासनातील भाषा ही अचूक व नेमकी असते

**भाषांतर :** एक शास्त्र भाषेला स्वतःचे शास्त्र असून त्यामध्ये ध्वनी शब्द वाक्य इत्यादींचे सैद्धांतिक विवेचन असते. एका भाषेतील शब्द अर्थ वाक्य प्रयोग वाक्यप्रचार इत्यादींशी समतोल्य घटक दुसऱ्या भाषेत निवडताना सैद्धांतिक ज्ञानाची मदत घ्यावी लागते. त्यामुळे भाषांतर हे एक शास्त्रच म्हणावे लागते. परंतु प्रत्यक्ष भाषांतर करताना सैद्धांतिक नियमाचे काटेकोरपणे पालन करता येणे शक्यच नसते. म्हणून अनेक ठिकाणी नियमोल्लंघन करावे लागते.त्यावेळी भाषांतर हे कलेच्या अंगाने झुकते. भाषांतराला निवडीचे स्वातंत्र्य असते. भाषांतर काराला हा त्याच्या दोन्ही भाषेतील प्रभुत्व कौशल्य अजमावून भाषांतर करीत असतो. हे प्रभुत्व सारखेच असते असे नाही. शास्त्रीय आणि वैज्ञानिक ग्रंथांचे भाषांतर हे व्यक्ती निरपेक्ष व वस्तुनिष्ठ असते. त्यामुळे भाषांतर हे कला व शास्त्र आहे.

अशोक केळकर यांच्या मते, अनुवाद प्रक्रिया म्हणजे मुख्यतः अनुवादाच्या मनातील निर्णय प्रक्रिया मांडताना जेव्हाही निर्णय प्रक्रिया स्पष्टपणे टप्प्याटप्पाने विशिष्ट सूत्रांना अनुसरून पुढे सरकते तेव्हा अनुवाद क्रिया शास्त्रानुसार चालते, पण जेव्हाही निर्णय क्रिया अस्पूट पणे तारतम्य बुद्धीनुसार घडून जाते. तेव्हा अनुवाद क्रिया कलेनुसार चालते. मात्र अनुवाद प्रक्रिया पूर्णतः शास्त्रानुसार चाळणी ज्यावेळी शक्य असते त्या प्रसंगी किंवा त्या टप्प्यावर ती संगणकांच्या हवाली करता येते. असे डॉ. केळकर यांनी नमूद करून पुढे म्हटले आहे की, परिभाषासापेक्ष भाषा व्यवहारयुक्त मूळ पाठ्याचा परिमीत छायानुवाद (अनुवाद- प्रतिरोप निर्मिती (धर्मग्रंथांचा अनुवाद), तौलनिक शब्दकोश किंवा तौलनिक व्याकरण यामधून संभाव्य प्रतिशब्द, प्रतीशब्दरचना यांची यादीच यासंदर्भात उपस्थित करता येते. कलाकृती पेक्षा शास्त्रीय ग्रंथाचे भाषांतर सहज सुलभ करताना अशा ग्रंथात माहिती प्रधान मजकुर असतो. तो समजावून घेत शास्त्रोक्त भाषांतर करावे लागते''[५]. अज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान तसेच अन्य भाषातील विविध प्रकारचे प्रमाणपत्र ग्रंथ आपल्या भाषेत आणण्यासाठी भाषांतराचे शास्त्र समजणे महत्त्वाचे असते.

**अनुवाद : एक कला :** अनुवादामध्ये भाव आणि शब्दांची निवड महत्त्वाची

असते. भाषांतर हा मूळ भाषेतील असे दुसऱ्या भाषेत जसेच्या तसे उतरवत असतो. प्रत्यक्ष भाषांतर काय हा आपल्या क्षमतेनुसार कौशल्यानुसार भाषांतराचे स्वरूप बदलत असतो. त्यामुळे भाषांतर हे शास्त्र होऊ शकत नाही. यासंबंधी डॉ. कल्याण काळे म्हणतात, भाषांतराचे काही एक शास्त्र सांगणे शक्य असले, तरी भाषांतर ही एक कला व्यक्तिनिष्ठ कलाच होईल[६]. भाषांतर ही कला असली तरी तिला अभ्यासाची आणि व्यासंगाची ची जोड द्यावी लागते. भाषांतर ही कला, शास्त्र आणि तंत्रही आहे. मात्र अनुवाद हा स्वाभाविक अविष्कार असून ही कला आहे असे म्हणणे योग्य ठरते. कारण त्या-त्या भाषांचे व्याकरण, शब्दसंग्रह, वैचारिकता सामाजिक सांस्कृतिक, आणि वाङ्मयीन संकेत भाषांतरका राला जाणीवपूर्वक पाळावी लागतात. त्याचप्रमाणे त्या त्या भाषेची प्रवृत्ती व रूपबंध वेगवेगळे असतात. म्हणून वाक्यरचना व व्याकरण शब्दसंग्रह या सर्वांचा व्यासंग भाषांतरका रा जवळ असणे महत्त्वाचे असते. मूळ भाषेतील आशय असे नेमकेपणाने दुसऱ्या भाषेत उतरवणे हे कौशल्याचे काम आहे. म्हणूनच भाषांतरही कला असून ती एक पुनर्निर्मिती देखील आहे.[७] कल्याण काळे, यांच्या मते भाषांतर हे भाषेचे प्रगत कौशल्य आहे. ते सरावाने अनुभवाने व प्रामाणिकपणाने साध्य होऊ शकते. पण शास्त्रीय घटीता प्रमाणे त्याचा पडताळा पाहता येत नाही. शास्त्र म्हणजे तंत्र या ही अर्थाने भाषांतर हे शास्त्र होऊ शकत नाही. कारण भाषांतराचे तंत्र नसते कारण भाषांतरकारच्या दोन्ही भाषांवरील प्रभुत्वानुसार जमेल तसे भाषांतर करत असतो. म्हणजेच भाषांतर ही एक कला मानली. तर केवळ प्रतिशब्द देऊन भाषांतर करता येत नाही. त्याला भौगोलिक, सामाजिक राजकीय, सांस्कृतिक संस्कृतीची जोड द्यावी लागते. एखाद्या ललित साहित्यकृतीचे भाषांतर करताना शैली, संवाद आणि लेखकाचे व्यक्तिमत्व हे घटक जसेच्या तसे भाषांतरीत होणे कौशल्याचे काम आहे. म्हणून भाषांतरही कला असून ती एक नव निर्माणक्षम कला आहे. एकूणच, भाषांतर ही कला असली तरी ती सहज कला नाही. भाषांतराच्या नियमांचे उपयोजन करताना भाषांतरकाराला कला कौशल्य दाखवावे लागते. भाषांतराची पार्श्वभूमी शास्त्रीय असली तरी प्रत्यक्ष भाषांतर हे साहित्य कलेमध्येच येते. म्हणून अनुवाद हा शास्त्र आणि कला यांचा एक संगम असतो.

**समारोप :** भाषांतर ही जशी कला आहे तसे ते शास्त्र आहे. त्याचबरोबर भाषांतर हे शास्त्र आणि कला एकाच वेळी असते. भाषांतर हे व्यक्तीनिष्ठ असते. म्हणून भाषांतराला कला म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. कारण भाषांतराची भाषा, संस्कृती आणि भावना यांचा प्रभाव कलेकडेच जास्त असतो. म्हणून भाषांतरही कला आहे. असे थिओडोर सँव्हरी Art of Translation या ग्रंथात भाषांतर ही कला

आहे असे म्हणतो.

**निष्कर्ष :**

१) मूळ मजकुरातील मूळ शब्दाशी जास्तीत जास्त इमान राखणारे ते भाषांतर

२) मूळ असे कायम ठेवून शैलीसाठी थोडाफार सैलपणा स्वीकारणारा व तरीही मूळ साहित्य कृतीशी घट्ट नाते सांगणारा तो अनुवाद

३) भाषांतर करण्याची प्रक्रिया समांतर पातळीवर जरी असली तरी प्रत्येकाची अभिव्यक्त करण्याची शैली मात्र स्वतंत्र असते.

४) अनुवाद हा कला व शास्त्र यांचा संगम असत

५) अनुवाद ही पुनर्निर्मिती असते

**संदर्भ**


१) डॉ. काळे कल्याण, सोमण अंजली (संपा) : भाषांतर मीमांसा १९९७ प्रतिमा, प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र.८

२) भाषांतर शास्त्र की कला (संपा.) फाटक, म. वि. ठाकूर रजनी १९८७ पृ. क्र ९

३) तत्रैव :पृ क्र १०.

४) केळकर अशोक (डॉ): मध्यमा भाषा आणि भाषा व्यवहार, प्रथम आवृत्ती १९९६, पृष्ठ १५०/१५१

५) तत्रैव :पृ. क्र ३८

६) तत्रैव :पृ. क्र ३९

७) डॉ. काळे कल्याण, सोमण अंजली (संपा) : भाषांतर मीमासा १९९७ प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र २९


❑❑❑